## तहान

शब्द झाले कमी
संवाद तोटके
नात्याचे अस्तित्व - दोलायमान
अहं च्या पोटी
झाके साऱ्या त्रुटी
खोट्या प्रतिमेशी, आयुष्य - गहाण
उंचावोनी मान दारी
म्हणे प्रतिष्ठा प्रतिष्ठा
घरामाजी स्थान - कवडी समान
हव्यासाचे पेव
फुटे जागो जाग
भागावी कोणाची, कशी ही तहान ?

**प्रीती देशपांडे**

www.meetipreeti.com
preeti@meetipreeti.com